# राष्ट्रीय बातमीपत्र -09.20 AM

**दिनांकः 05.08.2020** **वारः बुधवार**

## ठळक बातम्या

- अयोध्येत आज राम मंदिराचा भूमिपूजन सोहोळा, सर्वत्र उत्साहाचं वातावरण
- सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना ९२ हजार कोटीपेक्षा जास्त कर्ज वाटप
- लेबनानची राजधानी बैरुतमध्ये शक्तिशाली स्फोटात किमान ७० जण ठार, चार हजारांहून अधिक जखमी
- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचं निधन आणि
- बिहारमधील पूरस्थिती गंभीर, ६४ लाख लोकांना फटका

**अयोध्या**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज अयोध्येत राम मंदिराचा भूमिपूजन सोहोळा होत आहे. पंतप्रधानांच्या हस्ते तेथील कोनशिलेच अनावरण होईल. श्री राम जन्मभूमी मंदिरावर काढण्यात आलेल्या एका विशेष टपाल तिकिटाचही त्यांच्या हस्ते अनावरण होईल. प्रत्यक्ष भूमिपूजन कार्यक्रम १२ वाजून ३० मिनिटांनी सुरु होईल. तो १२ वाजून ४५ मिनिटांपर्यंत चालेल. या कार्यक्रमासाठी १७५ निमंत्रित व्यक्ति उपस्थित असतील. त्यात विविध धर्म परंपरेचे १३५ संत उपस्थित राहणार आहेत. अयोध्येत आल्यानंतर पंतप्रधान प्रथम तेथील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतील. त्यानंतर ते जन्मभूमी स्थळावर राम लल्लाची पूजा करतील त्यानंतर प्रत्यक्ष भूमिपूजन कार्यक्रम होणार आहे.

आजच्या या कार्यक्रमानिमित्त जगभरातील राम भक्तांनी सर्वत्र भजन, कीर्तन, प्रसाद वाटप असे कार्यक्रम आयोजित करून हा सोहोळा साजरा करावा असं आवाहन उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि रामजन्म भूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टने केलं आहे. या कार्यामानिमित्त सर्व अयोध्या नगरी सजली असून तिथं सर्वत्र दिव्यांची नेत्रदीपक रोषणाई करण्यात आली आहे. या कार्यक्रमाच सकाळी ११ वाजून ४० मिनिटांनी आकाशवाणी वरून प्रत्यक्ष वर्णन केलं जाणार आहे. दूरदर्शन वरूनही या कार्यक्रमच थेट प्रसारण केलं जाणार आहे.

**कर्ज वितरण**

आपत्कालीन पत हमी योजनेअंतर्गत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सरकारी आणि खासगी बँकांनी काल अखेर ९२ हजार कोटीपेक्षा जास्त कर्ज वाटप केलं असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. या योजनेसाठी सरकारनं १ लाख ३७ हजार ५८६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. २३ मार्च ते ३१ ऑक्टोबर २०२० या कालावधीत वाटप केलेल्या कर्जांसाठी ही योजना लागू

असेल. कोरोना संसर्गाच्या काळात आर्थिक संकट दूर करण्यासाठी तसंच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना अतिरिक्त कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीनं ही योजना जाहीर करण्यात आली होती.

**अन्नधान्य**

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात आतापर्यंत विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी ४४ लाख टन अन्नधान्य उचललं आहे. केंद्रीय ग्राहक कल्याण मंत्रालायान काल ही माहिती दिली. या योजने अंतर्गत ८१ कोटी लाभार्थ्यांना एकूण २०१ लाख टन अन्नधान्य वाटप केलं जाणार आहे. त्यात १२ लाख टन चना डाळीचही वितरण केलं जाणार आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेचा दुसरा टप्पा १ जुलै पासून सुरु झाला असून तो नोव्हेंबर पर्यंत चालणार आहे. या मंत्रालायान म्हटलं आहे की देशात सध्या अन्नधान्याचा ७५९ लाख टन इतका साठा फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकड उपलब्ध आहे.

**रेल्वे निर्णय**

आर्थिक व्यवहारांना आणखी चालना देण्यासाठी भारतीय रेल्वेनं अनलॉक ३ अंतर्गत माल वाहतूक दरात सुधारणा केली असून आता ग्राहकांना अधिक सवलत देण्यात येणार असल्याचं रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं. मालवाहतुकीला चालना देण्यासाठी रेल्वे मिशन पातळीवर काम करत असून कोरोना संकटाचं मोठ आव्हान असतानाही रेल्वेनं यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत जास्त मालवाहतूक केली आहे. प्राण्यांच्या वाहतुकीसाठीचा विशेष दर तसंच पर्यायी गोदामातील मालाच्या वाहतुकीवर लावण्यात येणार अतिरिक्त शुल्क माफ करण्याचा निर्णय रेल्वेनं घेतला आहे. खुल्या वाघीण्यामधून केवळ ताडपत्री टाकून नेल्या जाणाऱ्या मालाच्या भाड्यात ४० टक्के सवलत देण्यात आली आहे.

**परीक्षा निकाल**

UPSC अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. एकंदर 829 जणांची विविध नागरी सेवांसाठी निवड झाली असून प्रदीप सिंह यानं देशातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. जतीन किशोर द्वितीय तर प्रतिभा वर्मा हिनं तृतीय क्रमांक मिळवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी UPSC मध्ये यशस्वी झालेल्या युवकांचं अभिनंदन केलं आहे. नागरी सेवेचं अत्यंत रोमांचक आणि आनंददाई क्षेत्र आपली प्रतीक्षा करत आहे, असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या युवकांनाही त्यांनी भविष्यात उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**जम्मू काश्मीर**

इच्छाशक्ती प्रबळ असेल तर कुठलंही काम कठीण नाही; हे जम्मू आणि काश्मीर या केंद्र शासित प्रदेशानं दाखवून दिलं आहे. जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेतल्याच्या घटनेला एक वर्ष पूर्ण होत आहे. सतत दहशतवादाचं सावट असलेल्या या भागात आता विकासाची गती वाढली आहे. सरकारच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. सौभाग्य योजनेअंतर्गत घरोघरी वीज

पोहोचवण्याचं १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करून जम्मू आणि काश्मीरनं एक नवा आदर्श निर्माण केला आहे. विशेष म्हणजे हे लक्ष्य वेळेआधीच पूर्ण करण्यात आल आहे. सौभाग्य योजनेअंतर्गत इथल्या ३ लाख ५७ हजार ४०५ घरांमध्ये वीज पोहचवण्यात आली आहे. दुर्गम, डोंगराळ भाग, सीमावर्ती भाग, दूर दूर असणारी घरं, आव्हानात्मक हवामान आणि विद्युतीकरणासाठी उपलब्ध असलेला अत्यंत मर्यादित कालावधी अशा अनेक अडचणींवर मात करत जम्मू काश्मीरचा उर्जा विभाग, महसूल अधिकारी, ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी अशा सर्वांनी मिळून हे लक्ष्य पूर्ण केलं.

**लेबनॉन स्फोट**

लेबनॉनमध्ये राजधानी बैरुत इथं काल रात्री झालेल्या एका स्फोटात किमान ७० लोक ठार झाले तर चार हजारापेक्षा अधिक लॉक जखमी झाले आहेत. हा स्फोट इतका जबरदस्त होता की त्यातून अनेक इमारतींची पडझड झाली असून त्याचा हादरा सर्व शहरभर जाणवला. स्फोटामुळ शहरात सर्वत्र धुराचे लोट उसळले होत्ते. स्फोटाचा आवाज २४० किलोमीटर अंतरावरील सायप्रस बेटावर ही ऐकू गेला. एका गोदामात २ हजार ७५० किलो अमोनिम नैट्रेट खूप दिवसांपासून साठवून ठेवले होते त्याचा हा स्फोट झाल्याचं सांगण्यात येत. या घटने निमित्त लेबनॉन मध्ये तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे.

माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. १९८५ ते १९८६ या काळात ते मुख्यमंत्री होते. लातुर जिल्यात निलंगा इथं आज त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात येतील असं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

बिहार राज्यातील पूर स्थिती अद्याप गंभीरचआहे. उत्तर बिहार मध्ये आणखी सात लाख लोकांना पुराचा तडाखा बसला आहे. राज्याच्या १६ जिल्ह्यातील एकूण सुमारे ६४ लाख लोकांना या पुराचा फटका बसला आहे. गेल्या २४ तासात मधेपुरा आणि सहरसा हे दोन नवीन जिल्हेही पूरग्रस्त झाले आहेत. समस्तीपुर, सीतामढी, गोपालगंज, पूर्व चम्पारण या जिल्यातील पूर स्थिती अद्याप गंभीरच आहे.

हवामान खात्यानं वर्तवलेला अंदाज खरा ठरवत पावसानं काल महाराष्ट्रात मुंबईसह कोकण आणि मध्य महाराष्ट्रात दमदार हजेरी लावली. मुंबईत संततधार पाऊस कोसळत होता त्यामुळे सखल भागात पाणी भरल्यानं वाहतूक व्यवस्था कोलमडली. आजही पाऊस सुरुच आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना पावसानं चांगलंच झोडपून काढलं. या जिल्ह्यांमधील सर्वच नद्या दुथडी भरुन वाहात आहेत.

**हवामान**

राजधानी दिल्लीत आज हवामान ढगाळ राहील. श्रीनगर, लडाख मध्ये आज हवामान बहुतांशी स्वच्छ राहील. गिलगीटमध्ये आज तापमान १७ ते ३७ अंश सेल्सियस राहील. कोलकाता इथं आज हवामान अंशत ढगाळ राहील. तिथं हलक्या ते जोरदार स्वरूपाच्या काही सारी पडतील. बंगालच्या

उपसागरावरील कमी दाबाचा पट्टा अधिक तीव्र झाला असून तो मध्य भारताच्या दिशेनं सरकत असल्यानं महाराष्ट्रात कोकण किनावरील मोसमी वाऱ्यांना बळ मिळालं आहे. त्यामुळे किनारपट्टीवर ताशी 50 ते 60 किलोमीटर वेगानं वाहणारे वारे दमदार पाऊस घेऊन आले आहेत. कोकणातला हा पावसाचा जोर उद्यापर्यंत कायम राहील. तोपर्यंत तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा धोका आहे. या वाऱ्यांचा प्रभाव काल पश्चिम महाराष्ट्रातही जाणवला मात्र आजपासून तो काहिसा कमी होईल.

याबरोरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.